# B) भारतीय संविधान :

# (Indian Constitution):

## 2.1 प्रस्तावना :

## (Preamble):

भारतीय राज्यघटना ही शासन संस्थेचा मूलभूत कायदा असते. भारतीय राज्यघटना म्हणजे असा दस्तऐवज ज्यामध्ये शासनाचे स्वरूप तसेच नागरिक आणि शासन यांच्यामधील संबंधांची निश्चिती आणि वर्णन करणाऱ्या कायद्यांचा आणि नियमांचा समावेश असतो.कोणत्याही राज्यघटनेचा सरनामा म्हणजे संबंधित राज्यघटनेचे स्वरूप, उद्दिष्टे व ध्येये स्पष्ट करणारी प्रस्तावना असते. म्हणून त्यास उद्देश पत्रिका असेही संबोधले जाते. घटनाकारांनी राज्यघटनेद्वारे साध्य करण्यासाठी जे लक्ष्य निर्धारित केले त्याचा आविष्कार सरनाम्यात पाहावयास मिळतो. त्याद्वारे जशी घटनेची आधारभूत मूल्ये व्यक्त होतात तसेच घटनेचे सामाजिक-आर्थिक-राजकीय तत्त्वज्ञान स्पष्ट होते. अशारितीने, सरनाम्यात घटनेचा गर्भितार्थतच आविष्कृत झालेला असतो. म्हणून सरनामा म्हणजे राज्यघटना जाणून घेण्याची गुरुकिल्ली मानता येते.

बिद्युत चक्रवर्ती (इंडियन कॉन्स्टिट्यूशन टेक्स्ट, कॉन्टेक्स्ट अँड इंटरप्रिटेशन) यांनी नोंदवल्याप्रमाणे अमेरिकी संविधानापासून घटनेचा सरनामा स्वीकारण्याची पद्धत सुरू झाली. त्यानंतर भारतासह अनेक देशांनी या पद्धतीचा अवलंब केला. मात्र, अमेरिका, कॅनडा आणि ऑस्ट्रेलिया या देशांच्या घटनांच्या सरनाम्याच्या तुलनेत भारतीय राज्यघटनेचा सरनामा विस्तृत आहे. त्यात संविधानाची निर्मिती कुणी केली, राज्यव्यवस्थेतील अधिसत्तेचा स्रोत कोणता, राज्यव्यवस्थेचे स्वरूप आणि उद्दिष्टे याविषयक स्पष्टीकरण दिलेले आहे. घटना समितीने 'सरनामा' हा दस्तऐवज राज्यघटनेमध्ये सर्वांत शेवटी समाविष्ट केला. सरनाम्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे घटना समितीने 26 नोव्हेंबर 1949 रोजी तो स्वीकृत केला. हा दिवस 'राष्ट्रीय कायदा' दिन म्हणून पाळला जातो. तसेच 2015 पासून हा 'संविधान दिवस' म्हणूनही साजरा केला जात आहे.

**⁕भारतीय राज्यघटनेची प्रस्तावना:**

**( Preamble to the Constitution of India):**

"आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सर्वभौम,समाजवादी ,धर्मनिरपेक्ष ,लोकशाही, गणराज्य घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांसः सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय; विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य;दर्जाची व संधीची समानता;निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि अखंडता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून; आमच्या संविधानसभेत आज दिनांक 26 नोव्हेंबर, 1949 रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतः प्रत अर्पण करत आहोत."

**⁕प्रस्तावनाची उत्पती:**

**(Origin of Preamble) :**

आकाश सिंग राठोड यांनी 'आंबेडकर्स प्रिॲम्बल - ए सिक्रेट हिस्ट्री ऑफ द कॉन्स्टिट्यूशन ऑफ इंडिया' या ग्रंथात भारतीय सरनाम्याची निर्मितीप्रक्रिया आणि त्याचा लेखक कोण याविषयी मांडणी केली आहे. त्यांच्या मते, सरनाम्याच्या निर्मितीविषयी (लेखन कुणी केले याविषयी) पुढील चार प्रकारचे परस्परविरोधी दावे केले जातात.

(1) प्रचलित समजुतीनुसार, जवाहरलाल नेहरू हे सरनाम्याचे निर्माते होते असे मानले जाते. भावी घटनेची उद्दिष्टे स्पष्ट करणारा नेहरूप्रणित उद्दिष्टांचा ठराव घटनासमितीने स्वीकृत केला हा या प्रतिपादनाचा आधार आहे.

(2) दुसऱ्या युक्तिवादानुसार बी. एन. राउ यांनी सरनामा निर्माण केला. राउ यांनी घटनात्मक सल्लागार म्हणून दिलेल्या जबाबदारीचा भाग म्हणून सरनाम्याची निर्मिती केली असे मानले जाते.

(3) तिसऱ्या दाव्यानुसार घटनासमितीच्या सामूहिक प्रयत्नातून सरनाम्याची निर्मिती झाली असे मानले जाते.

(4) मसुदा समितीच्या कामकाजाचे आणि त्यातील डॉ. आंबेडकरांच्या मध्यवर्ती, निर्णायक भूमिकेचे अवलोकन केल्यास डॉ.आंबेडकर हेच सरनाम्याचे निमति होते असा निष्कर्ष काढता येतो, अशी राठोड यांनी भूमिका मांडली. अर्थात राठोड यांनी आंबेडकर हेच साम्याचे ठरावीस दिलेली मंजुरी ते मसुदा समितीद्वारे सरनाम्यासंबंधी घेण्यात आलेल्या बैठका व चर्चा क प्रक्रियेचा तपशील लक्षात घेऊन उपरोक्त तिन्ही दाव्याना खोडून काढले. परिणामी, डॉ. आंबेडकर याच्याकडे निश्चितपणे नव्हे (not definitively) तर आपसूकच (by default) सरनाम्याचे जनकत्व जाते असे स्पष्ट केले.

*__सरनाम्याच्या मसुद्याचा प्रवास:__

**(Journey to the Draft of Preamble ):**

(1) काँग्रेस कार्यकारी समितीद्वारे स्थापित तज्ज्ञ समितीने 22 जुलै 1946 रोजी घटना समितीची उद्दिष्टे मांडणारे घोषणापत्र जाहीर केले. जवाहरलाल नेहरू (अध्यक्ष), असफ अली, के. एम. मुन्शी, एन. गोपालस्वामी अय्यंगार, के. टी. शाह, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हुमायून कबीर हे या तज्ज्ञ समितीचे सदस्य होते.

(2) जवाहरलाल नेहरू यांनी 13 डिसेंबर 1946 रोजी घटना समितीसमोर मांडलेला उद्दिष्टांचा ठराव 22 जानेवारी 1947 रोजी स्वीकारण्यात आला.

(3) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'स्टेट्स अँड मायनॉरिटीज' या निवेदनपत्रात 15 मार्च 1947 रोजी प्रस्तावित सरनामा माडला.

4) बी. एन. राउ यांनी 30 मे 1947 रोजी सरनाम्याचा एक मसुदा मांडला.

(5) मसुदा समितीची स्थापना होऊन (29 ऑगस्ट 1947) डॉ. आंबेडकरांची समितीच्या अध्यक्षपदी निवड झाली. मसुदा समितीने ऑक्टोबर 1947 पासून बी. एन. राउ यांनी तयार केलेल्या घटनेच्या मसुद्याची सखोल तपासणी करण्याचे कार्य सुरू केले. पुढे 6 फेब्रुवारी 1948 रोजी डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समितीची बैठक झाली ज्यात इतर 3 सदस्यच (अल्लादी कृष्णस्वामी अय्यर, मौलवी मो. सादुल्ला आणि एन. माधव राव) सहभागी झाले. तसेच राउदेखील सल्लागार म्हणून बैठकीस उपस्थित होते.

आकाश सिंग राठोड यांनी 6 फेब्रुवारी 1948 रोजी पार पडलेल्या मसुदा समितीच्या बैठकीसंबंधी जे तपशील उपलब्ध आहेत त्याआधारे हे अधोरेखित केले की, या बैठकीत सरनाम्याचा एक मसुदा माडण्यात आला जो उपरोक्त चारपैकी कोणताही नव्हता. प्रस्तुत बैठकीत सरनाम्याचा अचानक आलेला हा नवा मसुदा डॉ. आंबेडकराच्या अध्यक्षतेखालील बैठकीत माडण्यात आला. बैठकीत समाविष्ट एखाद्या सदस्याने हा मसुदा माडला याची कोणतीही नोंद नाही. त्यानतर 9 फेब्रुवारी 1948 रोजी मसुदा समितीची पुढील बैठक पार पडली ज्यात सरनाम्याचा मसुदा चर्चेसाठी घेण्यात आला आणि त्यात काही दुरुस्त्या करण्यात आल्या. पुन्हा दुसऱ्या दिवशी मसुद्याची चर्चा झाली. 21 फेब्रुवारी 1948 रोजी मसुदा समितीच्या अंतिम बैठकीत सरनाम्यात आणखी काही बदल करून घटनेच्या अंतिम मसुद्यासह सरनामाही घटना समितीस सुपूर्द करण्यात आला. शेवटी 26 नोव्हेंबर 1949 रोजी सरनाम्याचा स्वीकार करण्यात आला.

आकाश सिंग राठोड यांच्या मते, डॉ. आंबेडकरांनी 'स्टेट्स अँड मायनॉरिटीज'मध्ये मांडलेला सरनामा आणि मसुदा समितीच्या 6 फेब्रुवारी 1948 रोजीच्या बैठकीत माडण्यात आलेला सरनामा यात फारसा लक्षणीय फरक नव्हता. महत्त्वाची बाब म्हणजे, या नव्या सरनाम्यातील (6 फेब्रुवारी 1948 रोजी माडलेला) 'जातीय भेदभाव न करता प्रत्येक व्यक्तीच्या प्रतिष्ठेची हमी देणारी बधुता...' या आशयावर तर आशयात्मक दृष्टीनेदेखील डॉ. आंबेडकरांकडे सरनाम्याचे जनकत्व जाते.

***सरनाम्याचे विश्लेषण :**

**(Analysis of preamble):**

वस्तुतः घटनेच्या मूळ सरनाम्यात समाजवाद, धर्मनिरपेक्ष व अखंडता हे शब्द नव्हते. पुढे 1976 साली इंदिरा गांधी शासनाने 42 व्या घटना दुरुस्तीद्वारे 'समाजवादी, धर्मनिरपेक्ष' तसेच 'अखंडता' हे शब्द सरनाम्यात समाविष्ट केले. आजतागायत 'सरनाम्या'मध्ये केवळ एकदाच म्हणजे 1976 साली 42 वी घटना दुरुस्ती करून प्रस्तुत बदल समाविष्ट केले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने ही घटना दुरुस्ती वैध ठरविली.

भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याचे विश्लेषण केल्यास पुढील बाबी स्पष्ट होतात.

**(1) अधिसत्तेचा स्रोत:**

**(Source of authority):**

आम्ही भारताचे लोक' या सरनाम्याच्या प्रारंभीच्या आणि 'ही राज्यघटना स्वीकृत करत आहोत' या अखेरच्या शब्दांमधून हे घोषित केले आहे की, 'जनता' हाच राज्यघटनेचा स्रोत आहे. म्हणजे सार्वभौम जनताच अधिसत्तेचा अंतिम सोत असेल, हे स्पष्ट केले आहे.

प्रत्यक्ष घटनानिर्मितीच्या वेळी घटना समिती ही सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराधारे निवडण्यात आली नव्हती. तथापि, घटना समितीच्या प्रातिनिधिक स्वरूपाविषयी आक्षेप घेताना तत्कालीन परिस्थितीच्या मर्यादांकडे दुर्लक्ष करता येत नाही. शिवाय घटना स्वीकृत झाल्यानंतर त्याआधारे घेण्यात आलेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीद्वारे (1952) घटनानिर्मितीत मध्यवर्ती भूमिका बजावलेल्या काँग्रेसला पाठिंबा देऊन जनतेने घटनेला असलेला आपला पाठिंबाच सूचित केला. थोडक्यात, ऐतिहासिक वस्तुस्थिती म्हणून नव्हे तर तत्त्वतः 'भारतीय लोक'च सत्तेचा मूलस्रोत आहेत, हे स्पष्ट होते.

**(2) भारतीय राज्यव्यवस्थेचे स्वरूप:**

**(Nature of Indian polity):**

सरनाम्याद्वारे भारतीय राज्यव्यवस्थेचे स्वरूपदेखील स्पष्ट होते. त्यानुसार भारत हे सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य असेल असे उद्घोषित केले. या स्वरूपाची चर्चा पुढीलप्रमाणे करता येते -

**(अ) सर्वभौम:**

**(sovereign)**

15 ऑगस्ट 1947 रोजी भारत स्वतंत्र झाला. 1947 सालच्या 'भारत स्वातंत्र्य कायद्यानुसार' भारत हे 'ब्रिटिश कॉमनवेल्थ राष्ट्रांतर्गत' 'वसाहतीच्या स्वराज्याचा दर्जा' (Dominion Status) प्राप्त झालेले राष्ट्र बनले. भारतीय संविधानाची अंमलबजावणी होईपर्यंत, म्हणजे 15 ऑगस्ट 1947 ते 26 जानेवारी 1950 पर्यंत भारत वसाहतीचे स्वराज्य होते. 26 जानेवारी 1950 रोजी भारत 'सार्वभौम लोकशाही गणराज्य' (Sovereign Democratic Republic) बनले. सरनाम्यानुसार भारत हा एक सार्वभौम, स्वतंत्र देश असल्याचे घोषित केले आहे. भारत हा अंतर्गत व बहिर्गतदृष्ट्या सार्वभौम आहे. भारत आता ब्रिटिश अंमलापासून मुक्त झाला आणि आंतरराष्ट्रीय समुदायात इतर स्वतंत्र देशांप्रमाणेच त्यास समान दर्जा प्राप्त झाला, ही बाब 'सार्वभौम' या संज्ञेतून अधोरेखित भारताने स्वातंत्र्यानंतरदेखील राष्ट्रकुल संघाचे सदस्यत्व कायम ठेवले. त्यामुळे सार्वभौम तत्त्वाला बाधा येते असा आक्षेप घेतला होते. जातो. तथापि, या सदस्यत्वानुसार भारताने इंग्लंडच्या राजाचे/राणीचे राष्ट्रकुल परिषदेचे प्रमुखत्व केवळ स्वेच्छेने व प्रतिकात्मकरीत्या मान्य केले आहे. त्यामुळे भारताच्या सार्वभौमत्वाला कोणतीही बाधा येत नाही

**ब) समाजवादी :**

**(Socialist)**

सरनाम्यात 'समाजवादी' ही संज्ञा जरी 42 व्या घटना दुरुस्तीने 1976 साली समाविष्ट केलेली असली तर सुरुवातीपासूनच समाजवादी आशयाचा प्रभाव घटनेमध्ये प्रतिबिंबित झाल्याचे दिसून येते. राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे आणि कल्याणकारी राज्य स्थापन

करण्यासंदर्भातील इतर तरतुदींद्वारे हा आशय व्यक्त होतो. मात्र भारतीय राज्यघटनेतील या समाजवादी आशयामध्ये लोकशाही समाजवादावर आधारित कल्याणकारी राज्य अभिप्रेत होते. अर्थात, 1991 पासून भारताने अंगिकारलेल्या उदारीकरणाच्या धोरणामुळे राज्यव्यवस्था समाजवादी आशयापासून दूर गेली आहे. कारण, या धोरणामुळे राज्याच्या कल्याणकारी भूमिकेत मोठ्या प्रमाणात घट झाली आहे.

**(क) धर्मनिरपेक्ष:**

**(Secular)**

धर्मनिरपेक्ष म्हणजे भारतीय राज्यसंस्थेचा कोणताही धर्म नसेल, धर्म व राजकारण यांची सरमिसळ केली जाणार नाही, राज्य विविध धर्मांना भेदभावमूलक नव्हे तर समान वागणूक देईल आणि धर्म ही बाब खासगी जीवनापुरती मर्यादित असेल. अर्थात, सर्व लोकांना सद्सद्विवेकाचे तसेच स्वतःच्या निवडीनुसार धर्माचा प्रचार, प्रसार व आचरण करण्याचे स्वातंत्र्य असेल. 'जे राज्य घटनात्मकदृष्ट्या कोणत्याही धर्माशी बांधील नाही आणि त्यात हस्तक्षेपही करीत नाही; व्यक्तीला आणि समाजाला धार्मिक स्वातंत्र्याची हमी देते व व्यक्तीचा धर्म कोणताही असो तिच्याशी नागरिक म्हणून इतर सर्वांप्रमाणेच व्यवहार करते, तेच धर्मनिरपेक्ष राज्य होय', अशी व्याख्या भारतीय समाज विज्ञान कोशाने केली आहे. सेक्युलॅरिझम या शब्दाने व्यक्त होणारी संकल्पना एक नैतिक व्यवस्था आहे. स्वातंत्र्य आणि समता या मूल्यांवर आधारलेली, धर्माला त्यात लुडबूड न करू देणारी व ऐहिक जीवनाला महत्त्व देणारी अशी ती व्यवस्था आहे.

पुढे आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधींनी 42 व्या दुरुस्तीने 'समाजवादी' व 'धर्मनिरपेक्ष' अशी विशेषणे घटनेच्या सरनाम्यान समाविष्ट केली. मात्र, या 42 व्या घटना दुरुस्तीत 'सेक्युलर' शब्दाची व्याख्या करण्यात आली नव्हती. 45 व्या घटना दुरुस्ती विधेयकाद्वारे धर्मनिरपेक्ष आणि समाजवादी या शब्दांची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला. परतु या विधेयकाला राज्यसभेचा पाठिंबा मिळाला नाही. प्रस्तावित घटना दुरुस्तीने धर्मनिरपेक्ष या संज्ञेची व्याख्या 'सर्व धर्माविषयी समान आदर असणारे' अशी केली होती. वस्तुतः सर्व धर्माविषयी समान आदर या व्याख्येने धर्मनिरपेक्ष राज्याची सर्व वैशिष्ट्ये प्रकट होत नाहीत.

**(ड) लोकशाही:**

**( Democracy)**

राज्यघटनेद्वारा प्रातिनिधिक व संसदीय लोकशाहीचा स्वीकार करण्यात आला आहे. लोक व त्यांचे प्रतिनिधी यांच्यातील उत्तरदायित्व आणि जबाबदारीचे नाते हा लोकशाही व्यवस्थेचा मूलाधार आहे. म्हणजे लोकांना आपले प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार आहे, तर प्रतिनिधींनी लोकांच्या हिताची जपणूक करावी असे गृहीतक आहे. अशाप्रकारे लोकांचे, लोकांद्वारे व लोकांसाठी चालविल्या जाणाऱ्या लोकशाही शासनाचा निर्देश होतो. त्यासाठी सार्वत्रिक प्रौढ मताधिकार, व्यक्तिस्वातंत्र्य, स्वतंत्र न्यायव्यवस्था, मुक्त प्रसारमाध्यमे ही साधने पुरवली आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे 'भारतीय लोकशाही केवळ राजकीय जीवनापुरतीच मर्यादित नसावी तर सामाजिक व आर्थिक जीवनातही लागू केली जावी', अशी अपेक्षा संविधानकर्त्यांना होती.

**(आ) गणराज्य :**

**(Republic)**

गणराज्य पद्धती म्हणजे अशी पद्धती ज्यात राज्यप्रमुख हा वंशपंरपरेने नव्हे तर निवडणुकीच्या तत्त्वाद्वारे निवडला जाऊन पदग्रहण करत असतो. परंपरेतील विषमतामूलक आशयामुळे घटनाकारांनी परंपरेचे तत्त्व राजकीय-सार्वजनिक जीवनातून समूळ नष्ट करण्याचा निर्धार केला. त्यासाठी राष्ट्रपती हा राज्यप्रमुख म्हणून निवडणुकीद्वारे नियुक्त केला जाईल, अशी तरतूद केली.

**(3) भारतीय राज्यव्यवस्थेची उद्दिष्टे:**

**(Objectives of Indian polity)**

सरनामा केवळ राज्यसंस्थेचे स्वरूप स्पष्ट करत नाही तर या राज्यसंस्थेद्वारे साध्य करावयाची उदिटे कोणती आहेत, त्याचेही विवरण पुरवतो, त्यानुसार जनतेला न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांची प्राप्ती करून देणे ही राज्यव्यवस्थेची व पर्यायाने राज्यघटनेची उद्दिष्टे म्हणून घोषित केली गेली आहेत.

(अ) **न्याय** –

**(Justice):**

सरनाम्याद्वारे भारतीय समाजात राजकीय, सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात राजाईल. हा न्याय मानवी जीवनाच्या राजकीय जीवनासह सामाजिक व आर्थिक जीवनातही अवतरेल याची हमी देणे महत्त्वाचे ठरते. आले. न्याय म्हणजे समाजातील विषमता, शोषण, मनमानी स्वरूपाचा भेदभाव यांचे उच्चाटन करून सर्व व्यक्तींना सत्ता, प्रतिष्ठा व संपत्ती यांच्या समान वाटपाची हमी देणारी व्यवस्था होय. या व्यवस्थेत स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्वत्रयींचा सुवर्णमध्य साधला थोडक्यात, न्याय्य समाजावर आधारित न्याय्य राज्याची हमी देणे हे यामागील ध्येय आहे.

**(ब) स्वातंत्र्य** –

**(Freedom**)

घटनेचा सरनामा प्रत्येक व्यक्तीला विचार, अभिव्यक्ती स्वातंत्र्याबरोबरच श्रद्धा व उपासनेचे स्वातंत्र्यही बहाल करतो. कारण व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक निर्णय घेण्याची व त्यानुसार कृती करण्याची संधी स्वातंत्र्याद्वारे उपलब्ध होते. किंबहुना व्यक्तिस्वातंत्र्याशिवाय व्यक्तिविकास अशक्य आहे, याविषयी सर्व घटनाकर्त्यांमध्ये सहमती होती. म्हणून भारतीय संविधानाच्या विभाग तीनद्वारे विविध प्रकारची स्वातंत्र्ये बहाल केलेली आहेत.

**क) समता :**

**(Equality)**

स्वातंत्र्याच्या तत्त्वास अर्थपूर्ण करणारे तत्व म्हणून समतेच्या मूल्याचा स्वीकार करण्यात आला. परंतु समता म्हणजे शब्दशः समता नव्हे अथवा 'सब घोडे बारा टक्के' अशी एकदा नव्हे तर ममता ह आर्थिक तसाची व्यवस्था निर्माण करणारा कायद (Leveling) प्रक्रिया निर्माण करणे महत्त्वपूर्ण मानण्यात आले.

**(ड) बंधुता**:

(**brotherhood**):

स्वातंत्र्य व समतेच्या तत्त्वांना बंधुतेची जोड हवी, हे लक्षात घेऊनच घटनाकर्त्यांनी बंधतेचे मूल्य अधोरेखित केले मे मूल्य समाजातील सदस्यांमध्ये 'भावनिक बंध', 'आपलेपणाची भावना निर्माण करते. भारताला खऱ्याखुऱ्या अर्थान आधुनिक राष्ट्र संकल्पनेत संक्रमित करण्यासाठी बंधुतेची गरज आहे, हे ओळखूनच या तत्त्वाचा उद्‌घोष करण्यात आला.

(इ) व्यक्तिप्रतिष्ठा लोकशाही व्यवस्था प्रत्येक व्यक्तीच्या मूलभूत समानतेवर आधारभूत असते. व्यक्ती कोणत्याही जात, वंश, वर्ग, लिंगाची असो, ती मूलतः समान असते. प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे व्यक्तिमत्त्व असते. त्यामुळे प्रत्येक व्यक्ती जणू एक स्वयंमेव साध्य मानले जाते. कोणत्याही व्यक्तीचा साधन म्हणून वापर होणार नाही, याची हमी दिली जाते.

(फ) राष्ट्राचे ऐक्य आणि अखंडत्व एकत्वाची भावना हा राष्ट्रनिर्मितीचा व राष्ट्र चिरंतन राहण्याचा मूलाधार मानला जातो. भारतासारख्या भाषा, प्रदेश, धर्म, जात इ. विविध अस्मितांनी बनलेल्या बहुल समाजात ऐक्य निर्माण होणे आत्यंतिक महत्त्वाचे होते. त्याचबरोबर घटनेद्वारे निर्धारित केलेली उद्‌दिष्टे साध्य करताना राष्ट्र अखंडित राहील याचीदेखील हमी देणे अत्यावश्यक होते. म्हणूनच राष्ट्राचे ऐक्य आणि अखंडत्व मध्यवर्ती मानण्यात आले. अर्थात, 'अखंडत्व' हा शब्दप्रयोग 1976 च्या 42 व्या घटना दुरुस्तीने समाविष्ट करण्यात आला.

अशारितीने, भारतीय घटनेच्या सरनाम्यात आधुनिक लोकशाही शासनासाठी आवश्यक विविध तत्त्वांचे तत्त्वांचे प्रतिबिंब उमटलेले आहे.अर्थात, हे लोकशाही शासन सदैव लोककल्याणकारी राहिले पाहिजे, ही अपेक्षादेखील प्रतिबिंबित झाल्याचे दिसून येते.

सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश रमेशचंद्र (आर. सी.) लाहोटी यांनी आपल्या 'प्रिॲम्बल : द स्पिरीट अँड बँकबोन ऑफ द कॉन्स्टिट्यूशन ऑफ इंडिया' (2004) या पुस्तकामध्ये नमूद केले आहे की, "न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता हे ज्या क्रमाने मांडण्यात आले आहे, त्यातून विचार आणि विचारप्रणालीचा तात्त्विक प्रवास अधोरेखित होतो; त्याचबरोबर भारतीय राज्यघटना भविष्यात कशाप्रकारे कार्यरत राहील याचे ते सबळ निदर्शक आहे. या चार संकल्पनांमध्ये न्यायाची संकल्पना सर्वांत महत्त्वपूर्ण होय. लोकशाही राष्ट्रांमधील संस्था न्यायाशी (सामाजिक, आर्थिक आणि राजकीय) अनुरूप असतील अशा समाजामध्ये अंतिमतः स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या अन्य तीन तत्त्वांची उपलब्धी शक्य होते."

***सरनाम्यातून प्रतिबिंबित होणारे तत्त्वज्ञान:**

**(A philosophy reflected in Preamble):**

आधुनिक लोकशाही राज्यांनी विशिष्ट संविधानाचा स्वीकार करून त्याद्वारे आपल्या राजकीय समाजाच्या संघटनेची मूलतत्त्वे, तिचे स्वरूप आणि भावी समाजाचे आदर्श प्रारूप या बाबी निश्चित केल्या आहेत. घटना अथवा संविधान ही केवळ कायदे, नियम, अधिकार वाटपाची व्यवस्था नसून त्यात भावी समाजाविषयीचे काही आदर्शही प्रतिबिंबित होतात. त्यामुळेच प्रत्येक संविधानाला विशिष्ट असे तत्त्वज्ञान असते. भारतीय संविधानालादेखील विशिष्ट स्वरूपाचे तत्त्वज्ञान असून ते सरनाम्यातून आविष्कृत झाले आहे.

वास्तविक पाहता, घटना निर्मितीच्या वेळी घटनाकारांसमोर उदारमतवादी भांडवली लोकशाही, सोव्हिएत रशियाप्रणित साम्यवादी राजवट आणि गांधीवादी

राज्यव्यवस्था असे तीन प्रमुख विकल्प उपलब्ध होते. तथापि, यापैकी कोणतेही एक तत्त्वज्ञान अथवा विचारप्रणालीचा जशास तसा स्वीकार न करता घटनाकारांनी त्या सर्वांतील पोषक तत्त्वांचा स्वीकार करून सुवर्णमध्य साधण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. भारतीय समाजातील विषमता, अन्याय, शोषण लक्षात घेऊन त्यावर मात करण्यासाठी सामाजिक-आर्थिक न्यायाचे तत्त्वज्ञान स्वीकारण्यात आले. परंतु त्यामुळे व्यक्तिहिताला बाधा येऊ नये यासाठी लोकशाही मार्गानेच अपेक्षित सामाजिक परिवर्तन होईल याची हमी दिलेली आहे.

भारतीय घटनेचे अभ्यासक ग्रॅनव्हिल ऑस्टिन यांनी घटनेची तत्त्ववैचारिक बैठक स्पष्ट करताना समांतर क्रांत्यांची प्रक्रिया त्यांच्यामते, भारतीय समाजात वस्तुको परमादीनंतरच एक राष्ट्रीय व दुसरी सामाजिक अशा समांतर क्रांत्यांची प्रक्रिया सूत्र झाली. स्वातंत्र्यप्राप्तीने त्यातील राष्ट्रीय क्रांती साध्य झाली. मात्र, सामाजिक क्रांतीची प्रक्रिया अविरतपणे चालू राहणे अत्यावस्यक आहे. सरनाम्यातील व्यापक दृष्टी तसेच मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे यांद्वारे सामाजिक परिवर्तनाचे हे ध्येय साध्य करणे अभिप्रेत आहे.

राज्यघटनेच्या तत्त्ववैचारिक बैठकीची चर्चा करताना एक बाब ठळकपणे पुढे येते, ती म्हणजे गांधीवादाचा घटनानिर्मितीच्या प्रक्रियेवर पडलेला अत्यल्प प्रभाव. गांधींनी आत्मकेंद्री विवेकावर आधारित आधुनिक सभ्यता, केंद्रकारी व दमनकारी आधुनिक राज्यसंस्था व व्यक्तिपरायण भांडवलशाहीची समीक्षा करून अल्प गरजा, साधी राहणी, नैतिक-सामाजिक व्यक्ती, जनसहभाग आणि 'पायथा ते माथा' प्रारूपावर आधारित विकेंद्रित समाजव्यवस्था सांगितली. मात्र समाजवादी, मार्क्सवादी, खुद्द काँग्रेसमधील वर्चस्वशाली गट आणि डॉ. आंबेडकरांनाही गांधीजींच्या प्रारूपाविषयी तीव्र स्वरूपाचे आक्षेप होते. परिणामी, मार्गदर्शक तत्त्वांतील काही तरतुदी वगळता घटनेच्या निर्मितीवर गांधीजींचा फारसा प्रभाव पडल्याचे दिसून येत नाही. सरनाम्यातून आविष्कृत झालेली न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता ही तत्त्वे या बाबीचीच पुष्टी देतात की, पश्चिमेप्रमाणे भांडवली पद्धतीऐवजी अथवा सोव्हिएत रशियाप्रमाणे साम्यवादी राजवटीचा स्वीकार न करता दोहोंचा मेळ घालण्याचे कठीण कार्य केले आहे.

राज्यघटनेच्या प्रस्तावनेचे विश्लेषण केल्यास असे लक्षात येते की, उदारमतवादी लोकशाही शासन, लोककल्याणकारी राज्य आणि त्यासाठी लोकसहभागाची

आवश्यकता या मूलभूत घटकांवरच भारतीय घटनेची तत्त्ववैचारिक बैठक सिद्ध झाली आहे. मोजक्याच शब्दांत सांगायचे झाल्यास भारतीय घटनेच्या सरनाम्यातून प्रतिबिंबित होणारे तत्त्वज्ञान हे उदारमतवादी लोकशाही चौकटीवर आधारित कल्याणकारी राज्याचे आहे. त्यातून भारतीय समाजातील जात, वर्गीय व लिंगभावात्मक विषमतेला तिलांजली देण्यासाठी व्यापक सामाजिक-आर्थिक-राजकीय परिवर्तनाची दिशा स्पष्ट होते. अशा रीतीने भारतीय राज्यघटनेची प्रस्तावना ही एक शासनसंस्थेचा मूलभूत कायदा स्पष्ट करते.